**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कुवेतच्या 'द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मान.**
2. **पंतप्रधान उद्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करणार; नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या उपस्थितीत सीआरपीएफ हिंगणा येथे कार्यक्रम.**
3. **अमरावतीच्या भारतीय जनसंचार संस्था - आयआयएमसीच्या बांधकामाच्या निविदा प्रक्रियेत कंत्राटदारांनी पुढाकार घ्यावा- केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांचं आवाहन.**
4. **भारतानं १९ वर्षाखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट T20 स्पर्धेत विजेतेपद पटकावलं.**

कुवैत दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज कुवैतचे राजे आणि युवराजां सोबत भारत आणि कुवैत यांच्यातल्या सहकार्याबाबत चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांना कुवैतच्या- 'द ऑर्डर ऑफ मुबारक-अल-कबीर' या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

कुवैतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांनी, मोदी यांना हा पुरस्कार प्रदान केला. दरम्यान आपल्या कुवैत दौऱ्यात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवैतमधील, शेख-साद-अल-अब्दुल्ला या क्रीडा संकुलात आयोजित, 'हाला मोदी' या विशेष कार्यक्रमात, मोठ्या संख्येनं आलेल्या, कुवैतमध्ये स्थायिक भारतीय समुदायाला संबोधित केलं.

कुवैतमधील तिथल्या समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणारे भारतीय नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते. मोदी यांनी, कुवैतमधील, मीना अब्दुल्ला भागातल्या, लेबर कॅम्पला भेट दिली, जिथे जवळ जवळ, १,५०० भारतीय नागरिक, काम करतात.

पंतप्रधानांनी भारतातील विविध राज्यांतून तिथे आलेल्या मजुरांशी संवाद साधला आणि त्यांच्या आरोग्या विषयी चौकशी केली.

देशभरात विविध सरकारी मंत्रालयं आणि विभागांमध्ये नवनियुक्त ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्या, २३ डिसेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता दूरदृश्य प्रणालीद्वारे, नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. देशभरातल्या ४५ ठिकाणी या कार्यक्रमाचं आयोजन होणार असून, पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करतील.

नागपूरच्या हिंगणा इथल्या, सी.आर.पी.एफ. ग्रुप सेंटर इथं देखील, हा कार्यक्रम, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी सुमारे २२० नवनियुक्तांना, गडकरींच्या हस्ते, नियुक्तीपत्र प्रदान करण्यात येईल.

सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांसाठी, भरती केली जात असून, देशभरातून निवडलेले नवे उमेदवार, गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध मंत्रालये तसंच विभागांमध्ये, नियुक्त होतील.

देशाच्या वनं आणि वृक्षाच्छादनात, एक हजार ४४५ चौरस किलोमीटरनं वाढ झाली आहे. वनं सर्वेक्षण विभागानं, २०२३ मधे केलेल्या, वन स्थिती पाहणीचा अहवाल, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामानबदल मंत्री, भूपेंद्र यादव यांनी प्रसिद्ध केला. त्यात म्हटलंय की सध्या एकूण आठ लाख २७ हजार ३५७ चौरस किलोमीटर क्षेत्र, वन आणि वृक्षाच्छादित असून, ते देशाच्या एकूण भूभागाच्या, २५ पूर्णांक एक दशांश टक्के इतकं आहे. छत्तीसगड, उत्तरप्रदेश, ओडीशा आणि राजस्थानात, वनक्षेत्र वेगानं वाढलं असून, मध्यप्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि महाराष्ट्रात, अद्‌याप मोठी जंगलं टिकून आहेत. या आधीच्या पाहणीच्या तुलनेत, झाडा झुडुपांच्या स्वरूपातला कार्बन साठा देखील, आठ कोटी १५ लाख टनांनी वाढला असून, तो ७२८ कोटी ५५ लाख टनांच्या आसपास पोहोचला आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयात अंतर्गत, एक अभिमत विद्‌यापीठ त्याच प्रमाणे, माहिती प्रसारण मंत्रालय अंतर्गत स्वायत्त संस्था असलेल्या, अमरावतीच्या भारतीय जनसंचार संस्था अर्थात आय.आय.एम.सी. ही, सरकारद्‌वारे, ९० कोटी रुपयांच्या तरतुदीनं, बडनेरा इथल्या सुमारे १५ एकर जागेवर उभारण्यात येत आहे. यासाठी सी.पी.डब्ल्यू.डी.च्या e-tender.cpwd.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागवल्या जात असून, निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख, २७ डिसेंबर आहे.

देशभरातील तसंच विदर्भातील कत्राटदारांनी या माध्यम संवाद क्षेत्रातील सर्वोच्च संस्थेच्या, बांधकामाच्या निविदेसाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव, संजय जाजू यांनी आज, नागपूरमध्ये केलं.

माहिती प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या आय.आय.एम.सी.च्या उभारणीबाबत त्यांनी केंद्रीय लोक निर्माण विभाग नागपूरचे मुख्य अभियंता, प्रदीप दीक्षित यांच्याकडून या बांधकामाचा आढावा घेतला तसंच माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शन, पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो या कार्यालयाच्या प्रमुखांची बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी त्यांनी २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षांत, आय.आय.एम.सी.च्या काही शैक्षणिक संकुलाचं बांधकाम पूर्ण करून मिळावं अशी अपेक्षा व्यक्त केली.

*सीपीडब्लूडी ने ऑलरेडी इसके उपर एक टेंडर कॉल किया हुआ है, उस टेंडर कि लास्ट डेट २७ डिसेंबर है । हमें पुरी उम्मीद है कि इस क्षेत्र के जो भी बडे कॉन्ट्रॅक्टर हा इस क्षेत्र के या और बियॉंड देशभर के सारे कॉन्ट्रॅक्टर इस महत्वपूर्ण प्रोजेक्ट मे अपनी भागीदारी देंगे, बहुत अच्छा प्रोजेक्ट रहेगा उन के लिये भी. किसी किस्म कि इस मे कोई दिक्कते नही है, साईट पुरी क्लिअर है, रास्ता बना हुआ है, और जोरशोर से इस कार्य में हमारे कॉन्ट्रॅक्टर बंधू शामिल हो और हमारी पुरी कोशिश है कि आनेवाले २ महीने में इस काम हम अवॉर्ड कर सके, ताकी देढसाल हम इस पूरे कार्य को पूरा कर सके । और हमारा अकॅडमिक सेशन जो २०२६-२७ का रहे, पुरी आशा हम ये करते है वो हम हमारे नये कॅम्पस से शुरु करे ।*

या नवीन शैक्षणिक संकुलात, प्रशासकीय तसंच शैक्षणिक इमारत त्याच प्रमाणे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे वसतीगृह आणि कर्मचाऱ्यांसाठी, क्वार्टर्स तसंच २०० आसन क्षमतेचं सभागृह, या बांधकामाचा समावेश असणार आहे.

या बैठकी प्रसंगी आकाशवाणी नागपूरचे उप-महासंचालक, रमेश घरडे आय.आय.एम.सी. अमरावतीचे क्षेत्रीय संचालक, डॉ.राजेश कुशवाहा यासह, इतर अधिकारी उपस्थित होते.

गोंदियाचे पोलीस अधीक्षक गोरख भामरे, यांच्या नेतृत्वात गोंदिया पोलिसांनी गोंदिया शहरात घडणाऱ्या अपघातांवर आळा घालण्यासाठी, बेशिस्त वाहन चालविणाऱ्या तसंच विना-परवाना वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांची तपासणीला २० डिसेंबरपासून सुरवात केली असून, गोंदिया पोलिसांनी शहरात विना परवाना वाहन चालविणाऱ्या तसंच वाहनाचे डॉक्युमेंट नसलेल्या वाहन चालकांना आणि ट्रिपल सीट वाहन चालविणाऱ्या, १०३ वाहन चालकांवर कार्यवाही केली आहे. याबाबत माहिती देत आहेत गोंदीया जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक, नागेश भाषकर,

*सदर मोहिमेदरम्यान आपण १०३ वाहन ज्यांच्याकडे पेपर नाही, लायसन नाही आहे, अशा विविध कारणास्तव वाहतूक शाखा इथे डिटेन करून ठेवलेल्या आहे. त्याच्यानंतर दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी एकूण २८१ केसेस करण्यात आल्या आणि त्यादरम्यान २ लाख ६६ हजार ७५० रुपयाचा दंड देखील आपण वाहन चालकांना केलेला आहे. ही सर्व कारवाई अशी वेळोवेळी वाहतूक शाखेतर्फे संपूर्ण जिल्हाभर करण्यात येणार आहे, जेणेकरून वाहतुकीला शिस्त लागेल.*

१९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं बांग्लादेशला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं आहे. भारतीय महिला संघानं या स्पर्धेतले सर्व सामने जिंकत दणदणीत विजय मिळवून इतिहास रचला. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात, बांग्लादेशनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतानं प्रथम फलंदाजी करत २० षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. गोंगाडी त्रिशा हिनं ४७ चेंडूत ५२ धावा केल्या. विजेतेपदासाठी ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बांगलादेशचा संघ १८ षटकांत ७६ धावांवर गारद झाला. भारताकडून आयुषी शुक्लानं तीन बळी घेतले, तर परुनिका सिसोदिया आणि सोनम यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. त्रिशा हिला सामनावीर आणि मालिकावीर असे दोन्ही किताब देण्यात आले.

राज्यात आजही हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. राज्यात या सरत्या वर्षाच्या शेवटा पर्यंतच्या आठ दिवसांच्या कालावधीत, बहुतांश भागात वातावरण काही अंशी ढगाळ असणार आहे तर, काही ठिकाणी तुरळक पावसाचीही शक्यता आहे.

दरम्यान, सूर्याच्या उत्तरायणाला काल २१ डिसेंबरला प्रारंभ झाला. इथून पुढे हळूहळू दिवसाचा कालावधी वाढत जातो. सूर्य काल मकर वृत्तावर असल्यानं कालचा डिसेंबरचा दिवस हा सर्वात लहान म्हणजे अकरा तासांचा तर, रात्र तेरा तासांची होती.

उत्तर गोलार्धात हिवाळा सुरू झाल्यानंतर दिवस लहान तर रात्र मोठी होते. दरम्यान, आज विदर्भात सर्वात कमी तापमानाची नोंद नागपूर इथं ११ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस करण्यात आली.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा यांनी, केंद्र सरकारच्या क्षयरोग निर्मूलनाच्या तीव्र मोहिमेच्या शंभराव्या दिवसाच्या पार्श्वभूमीवर काल देशभरातल्या सर्व राज्यांच्या तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली.

क्षयरोग निर्मूलन मोहिमेसाठी सर्वतोपरी साह्य करण्याचं आवाहन, नड्डा यांनी या बैठकी दरम्यान केलं.